# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०९/१०/२०२२ (रविवार)**

**(सकाळ)**

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. सावनेर** :– दिनांक ०७/१०/२०२२ चे १८.०० वा. दरम्यान धापेवाडा ता. कळमेश्वर येथील उड्डाण पुलाचे खाली सुर्या फाले रा. धापेवाडा याचे चिकन दुकाना समोर रोडवर आरोपी नामे– महेंद्र धर्मराज हिवरकर, वय २० वर्ष, रा. धापेवाडा (खुर्द) ता कळमेश्वर, जि. नागपूर याने फिर्यादी नामे– धिरज शंकर धुर्वे वय २३ वर्ष, रा. वार्ड क्र १ धापेवाडा (खुर्द), ता. कळमेश्वर जि. नागपूर याचे सोबत झालेल्या शिवीगाळचे कारणावरून आरोपीने तो काम करीत असलेल्या चिकनच्या दुकानातील लोखंडी सत्तुराने फिर्यादीला जिवाने ठार मारण्याचे उद्देशाने त्याचे डोक्यावर तोंडावर घाव घालून गंभीर जखमी केले आहे.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३०७, ५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि शिवाजी नागवे मो.क्र. ७६६६९७९८६५ हे करीत आहे.

### चोरी

**१) पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत ११ कि. मी. अंतरावरील मौजा मोहगांव येथे दिनांक ०७/१०/२०२२ चे २२.०० वा. ते दिनांक ०८/१०/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास आरोपी क्र. १) प्रदीप लक्ष्मण बोरकर वय ३४ वर्ष, २) आकाश दुधराम खंगार, वय २३ वर्ष, ३) राहुल वामन भुरे वय २७ वर्ष, ४) मारोती भयामराम मेश्राम, वय २४ वर्ष, ५) अनुज इश्वर खंगार, वय १८ वर्ष, ६) सागर अनिल भुरे वय २१ वर्ष, सातही रा. मकरधोकडा ता.जि. भंडारा व वय १७ वर्षीय विधीसंघर्षग्रस्त बालक यांनी मौजा चिकना गावातुन मोहगांव गावाला जोडणारी ११ केव्ही वीज वाहीनीचे दोन सिमेंटचे इलेक्ट्रीक पोल पाडुन अंदाजे २०० मीटर ३४ SQMM ACSR ॲल्युमिनीयम तार किंमती १०,०००/–रू. चोरून त्याचे बंडल बनवुन ते घेवुन जाण्याकरीता वापरण्यात आलेली बोलेरो पिकअप क्र. एमएच– ३६ एए– १९४४ दिसुन आली. बोलेरोचे बाजुला एक दुचाकी स्पेलेंडर क्र एमएच– ४०/सी– ४३१६ दिसुन आली. सदर नमुद माल यातील आरोपी हे चोरून वाहतुक करतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– ब्रिजेशकुमार जगदीश यादव, वय ३५ वर्ष, रा. टेकानाका नारी रोड नागपुर ह.मु. भोजापुर ता. कुही यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि प्रमोद चौधरी मो. क्र.९८२३२१७२०५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०८ कि. मी. अंतरावरील मौदा चिकना येथे दिनांक ०७/१०/२०२२ चे २२.०० वा. ते दिनांक ०८/१०/२०२२ चे ०६.०० वा. सुमारास अज्ञात आरोपी यांनी मौजा बोरगांव ते चिकना गावाला जोडणारी ११ केव्ही वीज वाहीनीचे ११ पोल वरील अल्युमिनीयम तार अंदाजे २५० अंदाजे किंमती २५,०००/—रु. चा मुद्देमाल चोरुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— शेशराव निलकंठ तितीरमारे, वय ३५ वर्ष, धंदा— कनिष्ठ अभियंता म.रा.वि. वि.क.मर्या वडोदा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार हरीश यंगलवार मो.नं. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**